0 2 NOV 2022

लोकसत्ता

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# कर्मवीर समूह विद्यापीठाचे डी. टी. शिर्के पहिले कुलगुरू

लोकसत्ता वार्ताहर



**कराड :** कर्मवीर भाऊराव पाटील क्लस्टर युनिव्हर्सिटीचे (समूह विद्यापीठ) पहिले कुलगुरू होण्याचा बहुमान डॉ. डी. टी. शिर्के यांना मिळाला आहे. त्यांच्याकडे सध्या कोल्हापूर आणि मुंबई विद्यापीठाचाही प्रभारी कुलगुरू म्हणून कार्यभार आहे.

राज्य मंत्रिमंडळाने ५ मे २०२२ रोजी कर्मवीर भाऊराव पाटील समूह विद्यापीठ स्थापनेला मंजुरी दिली होती. केंद्र सरकारच्या मानव संसाधन विकास मंत्रालयाच्या मार्गदर्शक तत्त्वानुसार या विद्यापीठाची स्थापना करण्यात आली आहे. साताराच्या कर्मवीर भाऊराव पाटील समूह विद्यापीठात यशवंतराव चव्हाण विज्ञान संस्था, धनंजयराव गाडगीळ वाणिज्य महाविद्यालय, आणि छत्रपती शिवाजी महाविद्यालयाचा या साताऱ्यातील तीन महाविद्यालयांचा समावेश आहे.

ही तीनही महाविद्यालये स्वायत्त आहेत. आता त्याचे कामकाज प्रा. डॉ. दिगंबर शिर्के यांच्या नेतृत्वाखाली चालणार आहे. डॉ. शिर्के हे मुळचे वाठारतर्फ वडगाव ता. हातकणंगले जि. कोल्हापूर येथील आहेत. त्यांनी शिवाजी विध्यापीठातून संख्याशास्त्र विषयाचे पदव्युत्तर शिक्षण घेतले. पुढे शिवाजी विद्यापीठातून त्यांनी विद्या वाचस्पती (पी.एचडी.) पदवी घेतली.

प्राध्यापक, विभागप्रमुख, कुलसचिव, कुलगुरू यांचा पदभार त्यांनी समर्थपणे सांभाळला आहे.

02 NOV 2022 सकाळ जनसंपर्क कक्ष शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठांत अत्याधुनिक उपकरणांची सुविधा असावी

## प्रा. डॉ. एलांगनन अरुणन यांचे प्रतिपादन

कोल्हापूर, ता. १ : विद्यापीठांमध्ये विविध विषयांवरील महत्त्वाचे संशोधन केले जाते. विद्यार्थ्यांना त्यांच्या अध्ययनाच्या काळातच जर संशोधनासाठीची अत्याधुनिक उपकरणे उपलब्ध झाली तर त्यांचा उत्साह वाढेल. यासाठी प्रत्येक विद्यापीठात अत्याधुनिक उपकरणे उपलब्ध असणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन बंगळुरू येथील इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स (आयआयएससी) संस्थेच्या असेंद्रिय आणि भौतिक रसायनशास्त्र विभागाचे अध्यक्ष प्रा. डॉ. एलांगनन अरुणन यांनी केले. आज त्यांच्या हस्ते स्तुती कार्यशाळेचे उद्घाटन करण्यात आले. या वेळी ते बोलत होते.



**कोल्हापूर : स्तुती कार्यशाळेचे उद्घाटन मंगळवारी (ता.१) शिवाजी विद्यापीठात झाले. यावेळी डावीकडून प्रा. एलांगनन अरुणन, प्रा. आर. जी. सोनकवडे, प्र कुलगुरू प्रा. पी. एस. पाटील, प्रा. अरुण सावंत.**

भारत सरकारच्या विज्ञान व तंत्रज्ञान मंत्रालयाने शिवाजी विद्यापीठात स्तुती प्रशिक्षण कार्यशाळेचे आयोजन केले आहे. यात सात दिवस श्रीनगर, दिल्ली, बंगळूर, गोवा, मुंबई, पुणे येथील १४ संशोधकांची व्याख्याने होणार आहेत. विविध प्रतिष्ठित संस्थांमधून येणाऱ्या तज्ज्ञ प्राध्यापक व्याख्याते अतिशय प्रगतिशील उपकरणावर तांत्रिक बाबींची माहिती सर्वांना देणार आहेत. आज पहिल्या सत्रात मुंबई विद्यापीठाचे माजी प्रकुलगुरू प्रा. अरुण सावंत आणि प्रा. डॉ. अरुणन यांनी आपल्या विषयावर सहभागींना मार्गदर्शन केले. दुसऱ्या सत्रात सर्व सहभागी शिक्षक, प्राध्यापक व संशोधक विद्यार्थी यांना सैफ केंद्रातील उपकरणांच्या गटानुसार प्रात्यक्षिक दिले गेले. सहभागींपैकी काहींनी आणलेले सॅम्पलही येथे टेस्ट करून दिले.

या वेळी सैफ केंद्राचे प्रमुख डॉ. आर. जी. सोनकवडे म्हणाले, की स्वातंत्र्याच्या अमृतमहोत्सवांतर्गत अशा प्रकारचे अनेक कार्यक्रम देशभर राबविले जात आहेत. अशा प्रकारच्या स्तुती प्रशिक्षण कार्यक्रमांमुळे अनेक विद्यार्थी, संशोधक शिक्षक आणि उद्योगपतींना त्यांच्या नवनवीन कल्पना व संशोधन उच्चस्तरावर देण्यास, त्याच प्रकारे अत्याधुनिक उपकरणांशी परिचित होण्यास मदत होईल.

या वेळी प्रा. सावंत, शिवाजी विद्यापीठाचे प्रकुलगुरू प्रा. पी. एस. पाटील, डॉ. के. डी. पवार, डॉ. डी. एस. भांगे व विद्यापीठातील प्राध्यापक उपस्थित होते. अश्विनी पाटील यांनी सूत्रसंचालन केले. स्तुती प्रकल्पाचे वरिष्ठ प्रकल्प सहयोगी डॉ. मकसूद वाईकर यांनी आभार मानले.

पुढारी

# प्रत्येक विद्यापीठात अत्याधुनिक उपकरणांची सुविधा असावी

## प्रा. ई. अरुणन; विद्यापीठात 'स्तुती' प्रशिक्षण कार्यक्रमाचे उद्घाटन

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

प्रत्येक राज्य विद्यापीठात अत्याधुनिक उपकरणांची सुविधा उपलब्ध असावी, अशी अपेक्षा इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स बंगळूरचे प्रा. ई. अरुणन यांनी व्यक्त केली.

शिवाजी विद्यापीठात भारत सरकारच्या विज्ञान व तंत्रज्ञान मंत्रालय प्रायोजित स्तुती प्रशिक्षण कार्यक्रमाचे मंगळवारी उद्घाटन झाले. यावेळी ते बोलत होते. प्र कुलगुरू प्रा. पी. एस. पाटील अध्यक्षस्थानी होते.

यावेळी राजस्थान विद्यापीठ, जयपूरचे माजी कुलगुरू प्रा. अरुण सावंत यांची प्रमुख उपस्थिती होती. प्रा. ई. अरुणन यांनी विद्यापीठातील अत्याधुनिक विश्लेषणात्मक उपकरण सुविधा केंद्र (सैफ) पाहून समाधान व्यक्त केले.

पहिल्या सत्रात प्राध्यापक सावंत व प्रा. अरुणन यांनी मार्गदर्शन केले. दुसऱ्या सत्रात सहभागी शिक्षक प्राध्यापक व संशोधक विद्यार्थी यांना उपकरणांचे गटानुसार प्रात्यक्षिक दिले गेले. कार्यशाळेचे समन्वयक प्रा. आर. जी. सोनकवडे यांनी विविध विषयांची माहिती दिली. अश्विनी पाटील यांनी सूत्रसंचालन केले. स्तुती प्रकल्पाचे वरिष्ठ प्रकल्प सहयोगी डॉ. मकसूद वाईकर यांनी आभार मानले. यावेळी डॉ. के. डी. पवार, डॉ. डी. एस. भांगे यांच्यासह विद्यार्थी उपस्थित होते. दरम्यान, प्रशिक्षण कार्यक्रमांतर्गत सात दिवस श्रीनगर, दिल्ली, बंगलोर, गोवा, मुंबई, पुणे अशा देशातील विविध भागांतील १४ संसाधन व्यक्तींची व्याख्याने होणार आहेत. विविध प्रतिष्ठित संस्थांमधील तज्ज्ञ प्राध्यापक प्रगतिशील उपकरणांची तांत्रिक बाबीची माहिती देणार आहेत.

सकाळ

# मुलींचे संशोधनातील प्रमाण वाढण्याची गरज

## प्रकुलगुरू पी. एस. पाटील यांचे प्रतिपादन



**कोल्हापूर, ता. १ :** पदव्युत्तर पदविकेसाठी मुली मोठ्या प्रमाणात प्रवेश घेतात, मात्र पुढे संशोधनामध्ये त्यांचे प्रमाण कमी आहे. याचे कारण शोधले पाहिजे. विद्यार्थिनींना अधिकाधिक सुविधा देऊन संशोधनातील त्यांचे प्रमाण वाढवणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन प्र-कुलगुरू डॉ. पी. एस.पाटील यांनी केले. बेटी बचाव अभियानातील समन्वयकांच्या नुकत्याच झालेल्या कार्यशाळेत ते बोलत होते.

या कार्यशाळेला सांगली, सातारा, कोल्हापूर येथून समन्वयक आले होते. प्रास्ताविक बेटी बचाओ अभियानाच्या समन्वयिका डॉ. प्रतिभा देसाई यांनी केले. उद्‍घाटनप्रसंगी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के म्हणाले, 'मुलींच्या शिक्षणाला महत्त्व दिले पाहिजे. कारण शिक्षणातून मुलींना आत्मविश्वास येतो. मुलींना शिक्षणाच्या प्रवाहात आणण्यासाठी प्रयत्न केले जातील.'

प्रकुलगुरू डॉ. पी. एस. पाटील म्हणाले, 'पोस्ट ग्रॅज्युएशनमधून संशोधनाकडे येण्याचे मुलींचे प्रमाण अल्प असून, ड्रॉपआउट रेटची कारणे शोधून विद्यापीठ व महाविद्यालयामध्ये जास्तीजास्त प्रमाणात मुलींसाठी सुविधा पुरवून देण्याचे काम केले पाहिजे.' सामाजिक कार्यकर्ते संजय देशपांडे म्हणाले, 'पीसीपीएनडीटी कायद्याची कडक अंमलबजावणी होत असूनही त्यातून पळवाटा काढल्या जातात.' प्रमुख पाहुण्या म्हणून प्रा. डॉ. भारती पवार उपस्थित होत्या. सूत्रसंचालन सचिन कदम यांनी केले.

पुण्यनगरी

# 'बेटी बचाओ' कार्यशाळेस प्रतिसाद

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठामध्ये बेटी बचाओ अभियानांतर्गत विद्यापीठ अधिविभागांतील व विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालयांतील बेटी बचाओ समन्वयकांसाठी कार्यशाळा उत्साहात झाली. प्रास्ताविक अभियानाच्या समन्वयिका डॉ. प्रतिभा देसाई यांनी केले. उद्घाटनप्रसंगी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांची उपस्थिती होती.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

02 NOV 2022
तरूण भारत

# पदवीधरच्या ९, शिक्षकच्या ८ जागांसाठी निवडणूक

## विद्यापीठ निवडणूक : प्राचार्य, संस्थाचालक मतदारसंघात विद्यापीठ विकास आघाडीचे उमेदवार बिनविरोध

**प्रतिनिधी**
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठ निवडणूकीतून विविध अधिकार मंडळाच्या निवडणूक रिंगणातून ८३ जणांनी आपले उमेदवारी अर्ज माघार घेतले. तर उमेदवारांनी कुलगुरूंकडे केलेल्या अपीलावर बुधवार, २ रोजी सुनावणी होणार आहे. सुनावणीनंतर गुरूवार ३ नोव्हेंबर रोजी उमेदवारांची अंतिम यादी जाहीर होईल. दरम्यान, अभ्यासमंडळ मतदारसंघातील काही अभ्यास मंडळे बिनविरोध झाली आहेत. अधिसभा पदवीधरच्या ९ जागा आणि शिक्षकांच्या ८ जागांसाठी निवडणूक होणार आहे.

शिवाजी विद्यापीठातील विविध अधिकार मंडळासाठी १४ नोव्हेंबर रोजी मतदान होणार आहे. तत्पूर्वी अर्ज माघारीनंतर प्राचार्य ८ तर संस्थाचालक मतदारसंघातील ५ जागांवर विद्यापीठ विकास आघाडीचे उमेदवार बिनविरोध विजयी झाले आहेत. प्राचार्य मतदारसंघात अनुसूचित जाती प्रवर्गाचा उमेदवाराचा अर्जच आला नाही. तर एनटीसी प्रवर्गातील अर्जावर कुलगुरूंसमोर सुनावणी होणार आहे. अधिसभा पदवीधरमध्ये अनुसूचित जमाती प्रवर्गातील विद्यापीठ विकास आघाडीचा एक उमेदवार बिनविरोध झाला आहे. शिक्षक मतदारसंघातून दोन जागा, अभ्यास मंडळातील इतिहास अभ्यास मंडळाच्या तीन, रसायनशास्त्र अभ्यास मंडळ दोन तर राज्यशास्त्र एक तसेच अन्य अभ्यास मंडळाच्याही जागा सुटाने बिनविरोध जिंकल्या आहेत.



दरम्यान, गतवर्षी सर्व जागा लढविणाऱ्या शिवाजी विद्यापीठ आजी-माजी विद्यार्थी कृती समितीने यंदा मात्र विद्यापीठ विकास आघाडीला पाठिंबा दिला आहे. या समितीला एक नामनिर्देशित जागा देण्यात येणार असल्याचे सांगण्यात आले.

### शिव-शाहू आघाडी 'पदवीधर' लढणार

विद्यापीठ निवडणूकीत पदवीधर मतदार संघात एसटीची एक जागा बिनविरोध झाली आहे. मात्र उर्वरीत ९ जागांसाठी विद्यापीठ विकास आघाडी आणि शिव-शाहू आघाडी यांच्यात लढत होणार आहे.

### विद्यापीठ विकास आघाडीचा आज प्रचार शुभारंभ

अधिसभा पदवीधरच्या ९ तर शिक्षक मतदार संघातील ८ जागांसाठी होणाऱ्या निवडणुकीसाठी विद्यापीठ विकास आघाडी आणि सुटातर्फे आज बुधवारपासून प्रचाराला सुरूवात करण्यात येणार आहे.

सकाळ

# विद्यापीठ निवडणुकीतून ८३ जणांची माघार

## आघाडी, सुटाकडून बिनविरोधचे दावे

कोल्हापूर, ता. १ : शिवाजी विद्यापीठाच्या अधिसभा व विविध प्राधिकरणाच्या निवडणुकीची प्रक्रिया सुरू आहे. यामध्ये आज अर्ज माघार घेण्याची प्रक्रियाही पार पडली. त्यामध्ये ८३ उमेदवारांनी माघार घेतली, तर ४२ जणांनी अर्ज अवैध ठरल्याबद्दल अपील केले आहे. विद्यापीठ विकास आघाडीने १६ तर विद्यापीठ शिक्षक संघाने (सुटा) यांनी १५ उमेदवार बिनविरोध झाल्याचा दावा केला आहे.



या निवडणुकीतील संस्थाचालक गटातील ६ पैकी ५, प्राचार्य गटामधील १० पैकी ८ आणि शिक्षक गटातील विज्ञान, वाणिज्य, आयडीएसमधील प्रत्येकी एक असे एकूण १६ उमेदवार बिनविरोध निवडून आले आहेत. पदवीधर आणि अन्य गटातील उमेदवारांची नावे आणि प्रचाराचा प्रारंभ आज (ता.२) सायंकाळी ५ वाजता होणार आहे. सुटाने अभ्यास मंडळावरचे १३ उमेदवार बिनविरोध निवडून आले असल्याचा दावा केला असून, बहुतांश अभ्यासमंडळावर सुटाच्या उमेदवारांचे वर्चस्व असल्याचे त्यांनी सांगितले आहे.

**महिला प्राध्यापकाची कुलगुरूंकडे तक्रार**

उमेदवारी अर्ज भरण्यासाठी जाताना विद्यापीठातील काही प्राध्यापकांनी आपल्याकडे पाहून असभ्य भाषेत शेरेबाजी केली, असा आरोप एका महिला प्राध्यापकाने केला आहे. संबंधित प्राध्यापकांनी विद्यापीठाच्या प्रवेशद्वारावर आणि कुलसचिवांच्या कक्षाबाहेर शेरेबाजी आणि गैरवर्तन केल्याचे त्यांनी तक्रारीत म्हटले आहे. या प्राध्यापकांवर कारवाई करण्याची मागणी संबंधित महिला प्राध्यापकाने केली आहे.

02 NOV 2022

पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# 'सिनेट'साठी चुरस

## माघारीने हालचालींना वेग, १४ नोव्हेंबरला मतदान

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठ अधिसभा निवडणुकांमध्ये कमालीची चुरस वाढली आहे. मंगळवारी सायंकाळी माघार प्रक्रिया पार पडल्यानंतर हालचालींना वेग आला. अधिसभेच्या विविध गटांसाठी १४ नोव्हेंबर रोजी मतदान, तर १६ रोजी मतमोजणी होणार आहे.

शिवाजी विद्यापीठाची अधिसभा निवडणूक जाहीर झाल्यापासून शैक्षणिक वर्तुळामध्ये 'इलेक्शन फिव्हर' तयार झाला. अर्ज माघारीनंतर निवडणुकांचे चित्र स्पष्ट झाले.




विद्यापीठ विकास आघाडी, शिवशाहू आघाडी आणि आजी-माजी विद्यार्थी कृती समिती जोमाने निवडणुकीच्या तयारीला लागले आहेत.

अधिसभेसाठी ३९, विद्या परिषदेच्या ८ आणि प्रत्येक अभ्यास मंडळावर ३ सदस्य याप्रमाणे निवड होणार आहे. अधिसभेवर प्राचार्य गटातून १०, शिक्षक गटातून १०, संस्था संचालकांमधून ६, विद्यापीठ अधिविभागातील शिक्षकांमधून ३ आणि नोंदणीकृत पदवीधरांमधून १० सदस्य निवडायचे आहेत. निवडणुकीसाठी संस्थाचालक ११६, महाविद्यालयीन शिक्षक २ हजार ९४५, विद्यापीठ शिक्षक १६६, नोंदणीकृत पदवीधर ३६ हजार ३४३, प्राचार्य ९३ व विभागप्रमुख ९३७ मतदार मतदान करतील.

# ८३ अर्ज माघारी

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठ अधिसेभेसाठी निवडणूक प्रक्रिया सुरू आहे. मंगळवारी अर्ज माघारीच्या अखेरच्या दिवशी विविध गटांतील ८३ जणांनी अर्ज माघारी घेतले. अधिसभा निवडणुकीसाठी एकूण ५०१ अर्ज दाखल केले होते. त्याचे प्रशासकीय काम रात्री उशीरापर्यंत विद्यापीठात सुरू होते. यात सिनेटसाठी २९०, विद्या परिषदेसाठी २७ व ३६ अभ्यास मंडळाच्या प्रत्येकी तीन जागांसाठी १८४ अर्ज दाखल झाले होते. त्यापैकी ८३ अर्ज मंगळवारी मागे घेण्यात आले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

02 NOV 2022
पुढारी

# संस्थाचालक, प्राचार्य गटातील काही जागा बिनविरोध

## विद्यापीठ निवडणूक; ८३ हून अधिक जणांची माघार

कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा

शिवाजी विद्यापीठांतर्गत अर्जांच्या छाननी पूर्ण झाली आहे. अधिसभा सदस्य, अभ्यास मंडळे, संस्थाचालक, प्राचार्य गटातून काही जागा बिनविरोध झाल्या आहेत. ८३ जणांनी माघार घेतल्याचे समजते.

उमेदवारी अर्जांच्या वैधतेबाबत २ नोव्हेंबर रोजी अपील करता येणार आहे. ३ नोव्हेंबर रोजी अंतिम पात्र उमेदवारांची यादी प्रसिद्ध होईल.

निवडणुकीत अधिसभेच्या दहापैकी दोन जागांवर 'सुटा'चे पुरस्कृत उमेदवार बिनविरोध निवडून आले आहेत. अधिसभेच्या एस. टी. प्रवर्गातून डॉ. शिवाजी बोथीकर व महिला राखीव संवर्गातून प्रा. शाहीन पटेल बिनविरोध निवडून आले आहेत. इतिहास, राज्यशास्त्र व रसायनशास्त्र या अभ्यासमंडळांवर 'सुटा'चे बहुमत आहे. दहा अभ्यासमंडळांवर उमेदवारी अर्ज कमी असल्याने तिथे 'सुटा' पुरस्कृत १३ उमेदवार बिनविरोध झाले आहेत. अशी माहिती 'सुटा'चे प्रमुख कार्यवाह प्रा. डॉ. डी. एन. पाटील यांनी दिली.संस्थाचालक गटातून (५), प्राचार्य गटातून (८) जागा बिनविरोध झाल्या आहेत. प्राचार्य गटात एसटी प्रवर्गासाठी उमेदवार मिळाला नाही. विज्ञान, वाणिज्य, आयडीएस विद्याशाखा बिनविरोध झाले आहेत. अभ्यास मंडळावर बहुमत असल्याचे विकास आघाडीचे सहसचिव प्राचार्य डॉ. व्ही.एम.पाटील यांनी सांगितले. दरम्यान, विद्यापीठात मंगळवारी एक प्राध्यापिका निवडणूक कामानिमित्त आल्या होत्या. कुलसचिव कार्यालयाकडे जाताना तीन प्राध्यापकांनी शेरबाजी केली. याप्रकरणी प्राध्यापकेने कुलगुरूंकडे तक्रार दिली आहे.

### आजी-माजी कृती समितीचा आज निर्णय

शिवाजी विद्यापीठ आजी-माजी विद्यार्थी कृती समितीने पदवीधर सिनेट निवडणुकीतील उमेदवारी अर्ज मागे घेतले आहेत. कोणाला पाठिंबा द्यायचा, याचा निर्णय बुधवारी होणार आहे. कृती समिती विद्यापीठ विकास आघाडीबरोबर जाण्याची शक्यता आहे.

क्रांतीसिंह

# शिवाजी विद्यापीठ अधिसभा निवडणूक

## वंचित बहुजन आघाडी स्वतंत्र पॅनेल करून लढणार

कोल्हापूर (प्रतिनिधी):- शिवाजी विद्यापीठाच्या सिनेट निवडणुकीसाठी पदवीधर मतदारसंघातील १० जागांवर निवडणूक लढविण्यासाठी शिव शाहू आघाडी स्थापन करण्यात आल्यानंतर वंचित बहुजन आघाडीने सुद्धा निवडणुकीत उतरण्याचा निर्णय घेतला आहे. वंचित स्वतंत्र पॅनेल करून निवडणुकीच्या रिंगणात उतरणार आहे. वंचित बहुजन विद्यार्थी विकास आघाडी असे या पॅनेलचे नाव असेल. सांगली, सातारा, कोल्हापूर जिल्ह्यांतील प्रत्येक गावात कार्याकर यांचे जाळे असून पदवीधरांपर्यंत पोहोचून आम्ही आमची भूमिका मांडणार असल्याचा माहिती वंचित बहुजन आघाडीच्या राज्य कार्यकारिणी सदस्य डॉ. क्रांती सावंत यांनी दिली. वंचित बहुजन विकास आघाडीच्या इस्लामपुरात झालेल्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला. या बैठकीत स्वतंत्र पॅनेल करून अधिसभा लढवण्याचा निर्णय झाला. विद्यापीठाची निवडणूक



लढवण्याची सूचना ॲड. प्रकाश तथा बाळासाहेब आंबेडकर यांनी केली आहे. त्यानुसार स्वतंत्र पॅनेल करण्यात येणार आहे.

सिनेट निवडणुकीसाठी शिव शाहू आघाडी :- शिवाजी विद्यापीठाच्या सिनेट निवडणुकीसाठी पदवीधर मतदारसंघातील १० जागांवर निवडणूक लढविण्यासाठी शिव शाहू आघाडी स्थापन करण्यात आली आहे. या आघाडीमध्ये शिवाजी विद्यापीठ शिक्षक संघ सुटा, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे युवासेना, ऑल इंडिया युथ स्टुडंट फेडरेशन, स्टुडंट फेडरेशन ऑफ़ इंडिया या संघटनांचा समावेश आहे. शिवाजी विद्यापीठाचा सर्व कारभार हा विद्यार्थी, शिक्षक, पालक यांच्या हितासाठी पारदर्शी व स्वच्छ व्हावा, हा शिव-शाहू आघाडीचा मुख्य उद्देश आहे. विद्यार्थ्यांच्या सर्व परीक्षा त्यांचे वेळेवर निकाल लावणे, विद्यापीठाचा कारभार भ्रष्टाचार विरहित असणे, विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी आवश्यक सर्व भौतिक सुविधांचा विस्तार, विद्यापीठाच्या सर्व संसाधनांचा पर्याप्त वापर करणे, विद्यापीठाची स्वाययत्ता अबाधित राहणे, नविन शैक्षणिक धोरणातील सर्व सामान्य विद्यार्थी विरोधी तरतुदींना विरोध, शिक्षणाचे खासगीकरण व नफेखोरीत विरोध, विद्यार्थ्यांवरील भरमसाठ फीवाढ धोरणाला विरोध, विद्यापीठ व महाविद्यालयातील शिक्षक-शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या सर्व रिक्त जागा कायमस्वरूपी भरणे, महाविद्यालयांच्या एकत्रीकरणास विरोध तसेच छत्रपती शिवाजी महाराज, फुले-शाहू-आंबेडकर विचारधारेची व संविधानातील मूल्यांची जपणूक शिवाजी विद्यापीठात व्हावी या सर्व मुद्द्यावर शिव-शाहू आघाडी निवडणूक लढवणार असल्याचे निवेदनात म्हटले आहे.

क्रांतीसिंह

# विद्यापीठ सिनेट निवडणूक १४ नोव्हेंबरला

कोल्हापूर(प्रतिनिधी):- शिवाजी विद्यापीठ सिनेट निवड णूक १४ नोव्हेंबर रोजी असून या निवडणुकीमध्ये पदवीधर विभागातील १० जागेवर निवड णूक लढण्याचा निर्णय झाला आहे. आज सातारा, सांगली, आणि कोल्हापूर या विभागा तील प्रमुख शिवसेना पदाधि काऱ्यांची बैठक झाली. या बैठकीत



युवसेना विस्तारक डॉ. सतीश नरसिंग यांनी शिवाजी विद्या पीठाच्या सिनेट निवडणूक लढण्या साठीचे मार्गदर्शन व सूचना दिल्या. शिवाजी विद्या पिठाच्या येणाऱ्या विद्यार्थ्यांच्या व संस्थेच्या समस्या सोडवण्या साठी लवकरच जाहीरनामा प्रसिद्ध करण्याचे ठरले. दि. २९ ऑक्टोंबर रोजी सायंकाळ पर्यंत पॅनेल ची घोषणा करण यात येईल. असे जिल्हा प्रमुख संजय पवार व विजय देवणे यांनी पत्रकार परिषदेत जाहीर केले. शिवाजी विद्यापीठ सिनेट मतदार यांच्या पर्यंत संपर्क करण्यासाठी तालुका तालुका मेळावे घेण्याचे निश्चित करण यात आले आहे. शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या वतीने सिनेटचे पूर्ण पॅनेलचा निर्धार आजच्या बैठकीत करण्यात आलाफ यावेळी रविकिरण इंगवले, सुनिल मोदी, हर्षल सुर्वे,मंजीत माने, अमृता सावेकर, विना यक जाधव, वैभव जाधव, अव देश करंबे, कमलाकर जगदाळे, सुशील भांदिगिरे, अनिल पाटील, जयसिंग टीकिले,संतोष आयरे, प्रसाद पोवार, संतोष कांदेकर, किशोर दाभाडे,विनय क्षीर सागर, राहुल माळी, जयराम पोवार, युवराज मोरे,अवधूत पाटील, रवींद्र पाटील,सागर मावके, सुरेश पाटील,रितेश खोत उपस्थित होते.

लोकमत

# प्रभारी संचालकपदी डॉ. प्रकाश गायकवाड

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या



विद्यार्थी विकास विभागाच्या प्रभारी संचालकपदी डॉ. प्रकाश तुकाराम तथा पी. टी. गायकवाड यांची नियुक्ती मंगळवारी झाली आहे. प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांच्या हस्ते डॉ. गायकवाड यांना नियुक्तिपत्र देण्यात आले. त्यावेळी त्यांच्या विद्यार्थीभिमुखता, अनुभवाचा लाभ विद्यार्थी विकास विभागाला होईल, अशी अपेक्षा डॉ. पाटील यांनी व्यक्त केली. डॉ. गायकवाड गेली २८ वर्षे क्रीडा क्षेत्रात कार्यरत आहेत. विद्यापीठाच्या क्रीडा अधिविभागाचे प्रभारी संचालक म्हणून त्यांनी सहा वर्षे काम पाहिले आहे. अधिविभागप्रमुख, ॲथलेटिक्स प्रशिक्षक म्हणून काम पाहिले आहे. तत्पूर्वी त्यांनी वाळवा येथील क्रांतिसिंह नाना पाटील महाविद्यालयात शारीरिक शिक्षण संचालक म्हणून काम पाहिले आहे.

लोकमत

# हिवाळी परीक्षांचे अर्ज उद्यापासून भरावे लागणार

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठातील हिवाळी सत्रातील (ऑक्टोबर-नोव्हेंबर) विविध पदवी, पदव्युत्तर अभ्यासक्रमांची परीक्षा ऑफलाईन वर्णनात्मक स्वरूपात होणार आहेत. त्यासाठी विद्यार्थ्यांचे अर्ज भरण्याची प्रक्रिया गुरुवार (दि. ३) पासून सुरू होणार आहे. विद्यार्थ्यांनी ऑनलाईन अर्ज भरायचे आहेत.

हिवाळी सत्रापासून सर्व परीक्षा ऑफलाईन वर्णनात्मक पद्धतीने घेण्याचे नियोजन विद्यापीठाच्या परीक्षा व मूल्यमापन मंडळाने केले आहे. या परीक्षांसाठी अर्ज भरण्याची प्रक्रिया गुरुवारपासून सुरू होईल. दि.१६ नोव्हेंबरपर्यंत विनाविलंब शुल्कासह, दि.१८ ते २२ नोव्हेंबर दरम्यान विलंब, तर दि. २४ ते २८ नोव्हेंबर अतिविलंब शुल्काने अर्ज भरता येतील अशी माहिती संचालक डॉ. अजितसिंह जाधव यांनी दिली.

## ६०० परीक्षा, २ लाख विद्यार्थी

हिवाळी सत्रात बी. ए., बी. कॉम., बी. एस्सी, एम. ए. एम. कॉम., एम. एस्सी, अशा विविध ६०० अभ्यासक्रमांच्या परीक्षा होणार आहेत. त्यासाठी अर्ज करणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या सुमारे २ लाख असणार आहे.

02 NOV 2022
पुढारी
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिवाजी विद्यापीठातर्फे हिवाळी सत्र परीक्षेसाठी उद्यापासून अर्ज प्रक्रिया सुरू

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठाने पदवी, पदव्युत्तर ऑक्टोबर-नोव्हेंबर २०२२ मध्ये होणाऱ्या हिवाळी सत्रातील परीक्षेचे परीक्षा अर्ज भरण्याच्या तारखा प्रसिद्ध केल्या आहेत. त्यानुसार गुरुवार (दि. ३) पासून परीक्षा अर्ज भरण्याच्या प्रक्रियेस सुरुवात होणार आहे.

विद्यापीठ परीक्षा विभागाने पदवी, पदव्युतर कला, वाणिज्य, विज्ञान, शिक्षणशास्त्र, सर्व डिप्लोमा, सर्टिफिकेट, बी. व्होक., वायसीएसआरडीकडील अभ्यासक्रम तसेच अभियांत्रिकी, औषधनिर्माणशास्त्र, टेक्स्टाईल, बी.टेक., विधी, एमबीए आदी अभ्यासक्रम



परीक्षा अर्ज प्रक्रियेचे वेळापत्रक जाहीर केले आहे. विद्यार्थ्यांना महाविद्यालय, पदव्युतर विभागात दि. ३ ते १६ नोव्हेंबर याकालावधीत विनाविलंब शुल्क परीक्षा अर्ज भरता येणार आहे. दि. २८ नोव्हेंबरपर्यंत अतिविलंब शुल्कासह परीक्षा अर्ज भरता येणार आहेत. महाविद्यालयांनी विद्यापीठात १९ ते ३० नोव्हेंबर याकालावधीत विनाविलंब ते अतिविलंब शुल्कासहीत परीक्षा अर्ज याद्या सादर करावयाच्या आहेत. महाविद्यालय, पदव्युत्तर अधिविभागाने परीक्षा अर्ज ऑनलाईन अॅप्रुव्ह दि. १७ ते २९ नोव्हेंबर दरम्यान करायचे आहेत, अशी माहिती परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव यांनी दिली आहे.

सर्व अभ्यासक्रमांच्या प्रथम वर्ष प्रथम सत्राच्या परीक्षा अर्ज भरण्याच्या तारखा लवकरच प्रसिद्ध करण्यात येतील. तसेच अद्याप निकाल जाहीर न झालेल्या विद्यार्थ्यांचे परीक्षा अर्ज महाविद्यालयांनी अॅप्रुव्हल करू नयेत. निकाल जाहीर झाल्यानंतर अशा विद्यार्थ्यांचे परीक्षा अर्ज कॉलेज लॉगीनमधून डिलिट करून सुधारित निकालानुसार अर्ज करावेत, अशा सूचना परीक्षा विभागातर्फे देण्यात आल्या आहेत.

पुढारी

# विद्यार्थी विकास विभागाच्या संचालकपदी डॉ. गायकवाड



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या विद्यार्थी विकास विभागाच्या प्रभारी संचालकपदी डॉ. प्रकाश तुकाराम तथा पी. टी. गायकवाड यांची नियुक्ती करण्यात आली आहे. प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांच्या हस्ते डॉ. गायकवाड यांना नियुक्तीपत्र देण्यात आले. डॉ. गायकवाड गेली २८ वर्षे उच्च शैक्षणिक विशेषत: क्रीडा क्षेत्रात कार्यरत आहेत.

पुण्यनगरी

# ' विद्यार्थी विकास 'च्या संचालकपदी गायकवाड

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या विद्यार्थी विकास विभागाच्या प्रभारी संचालकपदी डॉ. प्रकाश तुकाराम गायकवाड यांची नियुक्ती करण्यात आली. ते गेली २८ वर्षे उच्च शैक्षणिक, विशेषतः क्रीडा क्षेत्रात कार्यरत आहेत. विद्यापीठाच्या क्रीडा अधिविभागाचे प्रभारी संचालक म्हणून त्यांनी ६ वर्षांहून अधिक काळ काम पाहिले आहे. त्यांनी अधिविभागप्रमुख व ॲथलेटिक्स प्रशिक्षक म्हणूनही काम पाहिले आहे. तत्पूर्वी त्यांनी वाळवा येथील क्रांतिसिंह नाना पाटील महाविद्यालयातही शारीरिक शिक्षण संचालक म्हणून काम पाहिले आहे. मंगळवारी दुपारी प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांच्या हस्ते त्यांना नियुक्तीपत्र देण्यात आले. कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के, प्रभारी कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांनीही त्यांचे अभिनंदन केले.



**पी. टी. गायकवाड**

02 NOV 2022

पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर



विज्ञानाच्या विश्वात

डॉ. व्ही.एन. शिंदे

# आणखी एक पृथ्वी...

मानवाची शोध घेण्याची क्षमता अफाट आहे. आपण कोणत्याही संकटावर मात करू शकतो. मानवी जीवन सुखकर बनवण्यासाठी नवतंत्रज्ञान शोधू शकतो. कोणत्याही संकटापुढे हार मानत नाही. अचानक उद्‌भवलेल्या संकटावर मात करत अस्तित्व अबाधीत राखू शकतो. याबाबत त्याचा विश्वास विज्ञान, तंत्रज्ञानाच्या प्रगतीसोबत वाढत आहे. मागील लेखात डिडिमस ग्रहाच्या डायमॉर्फिस चंद्रावर उपग्रह कसा आदळवला याची चर्चा केली. त्यामुळे अवकाशातून कोणतेही संकट आले, तर त्याचा सामना करता येऊ शकतो हे सिद्ध केले. वैज्ञानिकांना आत्मविश्वास मिळाला, तरीही एक प्रश्न उरतो तो म्हणजे अवकाशातील असंख्य ताऱ्यांभोवती असणाऱ्या ग्रहमालांपैकी एखाद्या ग्रहावर जीवसृष्टी असेल आणि ती जर आपल्यासारखी प्रगत असेल, त्यांनीही असाच विचार करून एखादे यान पृथ्वीवर धडकवण्यासाठी पाठवले तर... भिण्याचं कारण नाही, आपण अवकाशातच त्याचा नाश करू.

असं जरी असलं, तरी मानव नेहमी भितीच्या छायेत वावरतो. असंच उडत्या तबकड्यांचे गुढ अजून उकललेले नाही. त्यांच्या अभ्यासासाठी अमेरिकन अवकाश संशोधन संस्था 'नासा'ने वैज्ञानिकांचा एक गट या अभ्यासासाठी बनवला आहे. ते यावर अहोरात्र संशोधन करणार आहेत. त्यातच आणखी एक बातमी नासाच्या हवाल्याने प्रसिद्ध झाली. आपल्याच सौरमालेत आणखी एका ठिकाणी जीवसृष्टी असावी, असा संशोधकांना सुगावा लागला आहे. आजवर आपण केवळ सौरमालेतच नाही, तर अखिल विश्वात एकाच ग्रहावर जीवसृष्टी असल्याचे मानत आहोत. तो ग्रह म्हणजे पृथ्वी. मात्र, या समजाला तडा देणारी ही बातमी आहे.

अशी जीवसृष्टी सौरमालेतील शनी ग्रहाच्या भोवती फिरणाऱ्या टायटन या उपग्रहावर आहे, असे संकेत मिळाले आहेत. खरं तर शनीभोवती उपग्रहांचे कडे आहे. या कड्यांमध्ये सिलिका, लोहाचे ऑक्साईड आणि बर्फ आहे. कडे बनवणाऱ्या धुळीमध्ये सूक्ष्म कणांपासून दहा किलोमीटर लांबीचे तुकडे आहेत. आपणास पृथ्वीवरून ते सारे धूलिकण भासतात. शनीला एकूण ६३ चंद्र आहेत. त्यापैकी एक उपग्रह किंवा चंद्र म्हणजे टायटन. शनीचा हा सर्वात लक्षणीय उपग्रह आहे. याच्या मध्यभागी घनता जास्त आहे. टायटन हा पृथ्वीच्या चंद्रापेक्षा आकाराने थोडा लहान आहे. त्याची रुंदी ५०० किलोमीटरपेक्षा जास्त आहे. टायटन उपग्रहावर पृथ्वीप्रमाणेच नद्या, जलाशय आणि जलस्रोत असल्याचे संशोधकांना आढळून आले. टायटन ग्रहावर पृथ्वीप्रमाणे जलचक्र सुरू असते. टायटनभोवती वातावरणाचा जाड थर आहे. तेथे नेहमी पाऊस पडतो. पृथ्वीप्रमाणे तेथे निसर्गचक्र सुरू आहे. वादळे नेहमी होतात. वाळूची वादळेही निर्माण होतात. टायटन चंद्रावरील खनिजे वेगळी आहेत. येथे गोडे पाणीही असू शकते. नायट्रोजनचे प्रमाणही लक्षणीय असून वारे वाहताना याच वायूचा अधिक प्रभाव असतो. टायटनवर मिथेन वायूचा पाऊस पडत असल्याचे संकेत संशोधकांना मिळाले आहेत.

तरीही संशोधक त्यावर जीवसृष्टी आहे याबाबत साशंक आहेत. त्याचे महत्त्वाचे कारण म्हणजे शनी हा सूर्यापासून सहाव्या स्थानावर आहे. तो सौरमालेतील दुसऱ्या क्रमांकाचा मोठा ग्रह आहे. शनी ग्रह अजूनही वायुरूपात आहे. शनी ग्रह सूर्याभोवती एक प्रदक्षिणा २९ वर्षांत पूर्ण करतो. त्याचे सूर्यापासूनचे अंतर १,४२,६७,२५,४०० किलोमीटर इतके आहे. त्याची घनता पाण्यापेक्षा कमी आहे. शनीवर सूर्याचा प्रकाश अत्यंत अंधूक पडतो. इतक्या कमी सूर्यप्रकाशात पृथ्वीप्रमाणे समृद्ध जीवसृष्टी अस्तित्वात येऊ शकत नाही, असे जीवशास्त्रज्ञ म्हणतात. मात्र, तेथील तीव्र थंडी आणि मिथेनच्या असणाऱ्या अस्तित्वांमुळे टायटनवर काही जीवाणू असू शकतात. आज सूर्याचाही आकार वाढतो, तो प्रसरण पावतो, असाही निष्कर्ष संशोधकांनी काढला आहे. त्यानुसार सूर्य आणखी प्रसरण पावून त्याचा तीव्र प्रकाश टायटन उपग्रहापर्यंत पोहाचला तर निश्चितपणे तेथे जीवसृष्टी उत्क्रांत पावेल असे त्यांचे मत आहे. मात्र, यासाठी अब्जावधी वर्षे लागतील. तोपर्यंत आपली कितवी पिढी अस्तित्वात असेल, हे शोधावे लागेल. मात्र, मानवाला आणखी कोठेतरी जीवसृष्टी असल्याचे किंवा ती उत्क्रांत पावू शकते, याचे मिळणारे संकेत अनेक कारणांनी महत्त्वाचे ठरतात.

त्यातील महत्त्वाचे कारण म्हणजे पृथ्वीवरील वातावरण खरोखरच मानवाच्या वास्तव्यासाठी अयोग्य झाले, तर कोठेतरी त्याला उतरायला जागा मिळेल. ज्या शनीला आपण आजवर संकटकारक मानतो, साडेसातीचा ग्रह मानतो, त्रासाचा ग्रह मानतो, तोच ग्रह ही आशा देत आहे. दुसरे महत्त्वाचे म्हणजे, शनीच्या एखाद्या उपग्रहावर जर ही शक्यता असेल, तर इतर ताऱ्यांभोवती असणाऱ्या एखाद्या ग्रहावर जीवसृष्टी असण्याची शक्यता आणखी वाढते. संशोधक अनेक वर्षांपासून याचा शोध घेत आहेत. त्याबाबत अजून आशादायक संकेत मिळालेले नाहीत. मात्र, या नव्या संशोधनाने संशोधकांच्या मनात आशेची नवी पालवी फुटली आहे. मानव स्वतःचे अस्तित्व टिकवण्यासाठी ही सर्व धडपड करत आहे. त्याच्या मनात सदैव भीती आहे. पृथ्वी जर राहण्यायोग्य राहिली नाही, तर मानवी अस्तित्व कसे टिकवायचे हा त्याच्यासमोर प्रश्न आहे. मात्र, ही परिस्थिती कोणी निर्माण केली, पृथ्वी ग्रह कायम वास्तव्यासाठी चांगला कसा राहील, याचा विचार खूप कमी केला जातो. मध्यंतरी आणखी एक जाहिरात वाचनात आली. त्यात म्हटले होते, केवळ ९५ लाख डॉलरमध्ये २४ तासात १४ वेळा सूर्योदय आणि सूर्यास्त पाहता येणार. हे शक्य होणार, कारण एवढे पैसे आकारून यानातून तुम्हाला अंतराळात अशा उंचीवर नेले जाणार की, तेथे २४ तासात सूर्योदय आणि सूर्यास्त चौदावेळा पाहता येईल. मानवांकडे अशा गोष्टीसाठी पैसा आणि वेळ आहे; मात्र ज्या वसुंधरेने मानवाला समृद्ध जीवन दिले, सौंदर्याने भरलेला निसर्ग दिला, तिचे सौंदर्य जपण्यासाठी वेळ आणि पैसा खर्च करण्यास माणूस तयार नाही. विचार व्हायला हवा!

vilasshindevs44@gmail.com
संपर्क : ९६७३७८४४००

सकाळ

# गतारे यांची महावीर अध्यासनाला देणगी

**कोल्हापूर :** श्रीमती सरितादेवी गतारे यांनी शिवाजी विद्यापीठाच्या भगवान महावीर अध्यासनाच्या प्रस्तावित इमारत बांधकामासाठी एक लाख रुपयांची देणगी दिली. भगवान महावीर अध्यासन इमारत देणगी संकलन समितीचे अध्यक्ष प्रा.डॉ. जे. एफ. पाटील यांच्याकडे त्यांनी ती सुपूर्द केली. त्यांनी यापूर्वी दहा हजार रुपयांची देणगी अध्यासनास दिली होती. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र. कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, तसेच कुलसचिव व्ही. एन. शिंदे व वित्त व लेखा अधिकारी अजित चौगुले यावेळी उपस्थित होते. अध्यासनाच्या भव्य इमारत बांधकामासाठीच्या देणगीला आयकरातून शंभर टक्के सूट असून, इच्छुकांनी मदत करावी, असे आवाहन प्रा. डॉ. विजय ककडे यांनी केले आहे.

सकाळ

# विद्यार्थी विकास विभागाच्या संचालकपदी डॉ. गायकवाड

**कोल्हापूर, ता. १ :** शिवाजी विद्यापीठाच्या विद्यार्थी विकास विभागाच्या प्रभारी संचालकपदी डॉ. पी. टी. गायकवाड यांची नियुक्ती करण्यात आली आहे.



**प्रकाश गायकवाड**

डॉ. पी. टी. गायकवाड हे गेली २८ वर्षे उच्च शैक्षणिक विशेषतः क्रीडा क्षेत्रात कार्यरत आहेत. विद्यापीठाच्या क्रीडा अधिविभागाचे प्रभारी संचालक म्हणून त्यांनी सहा वर्षांहून अधिक काळ काम पाहिले आहे. तसेच, अधिविभाग प्रमुख आणि ॲथलेटिक्स प्रशिक्षक म्हणूनही काम पाहिले आहे. तत्पूर्वी त्यांनी वाळवा येथील क्रांतिसिंह नाना पाटील महाविद्यालयातही शारीरिक शिक्षण संचालक म्हणून काम पाहिले आहे. त्यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यापीठाच्या क्रीडापटूंनी अनेक राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्पर्धांत वैयक्तिक व सांघिक गटांत लक्षवेधी कामगिरी केली आहे. आज दुपारी प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांच्या हस्ते डॉ. गायकवाड यांना नियुक्तीपत्र देण्यात आले.

सकाळ



कोल्हापूर : बास्केटबॉल स्पर्धेचे उद्घाटन करताना सुशील पाटील-कौलवकर.

# कोल्हापूर विभागीय बास्केटबॉल स्पर्धा सुरू




**कोल्हापूर, ता. १ :** शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर आणि राधानगरी महाविद्यालय आयोजित कोल्हापूर विभागीय बास्केटबॉल स्पर्धा आजपासून सुरू झाल्या. शहाजी लॉ कॉलेजच्या मैदानावर सुरू असलेल्या या स्पर्धेत दहा संघ सहभागी झाले आहेत. सुशील पाटील-कौलवकर यांच्या हस्ते उद्घाटन झाले.

क्रीडा संचालक शिवाजी विद्यापीठचे प्रा. डॉ. शरद बनसोडे, नाईट कॉलेजचे प्राचार्य प्रा. डॉ. सुरेश फरकटे, राष्ट्रीय प्रशिक्षक डॉ. जमीर सय्यद, प्राचार्य डॉ. डी एस मोरूस्कर, आयोजक प्रा. डॉ. निलेश पाटील, बिद्री महाविद्यालयचे प्रा. डॉ. एन. डी. पाटील, प्रा. विश्वास पाटील, प्रा. ढेरे, प्रा. एक्कल, तसेच बास्केटबॉल प्रेमी आणि विद्यार्थी उपस्थित होते.

तरुण भारत

# दूरशिक्षण प्रवेशासाठी १५ नोव्हेंबरपर्यंत मुदत

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या दूरशिक्षण आणि ऑनलाईन शिक्षण केंद्राची शैक्षणिक वर्ष २०२२-२३ ची बी.ए., बी.कॉम, एम.ए. (मराठी, हिंदी, इंग्रजी, समाजशास्त्र, राज्यशास्त्र, अर्थशास्त्र, इतिहास), एम.कॉम, एम.एस्सी (गणित) आदी अभ्यासक्रमाच्या प्रवेश प्रक्रियेस मंगळवार १५ नोव्हेंबरपर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे, अशी माहिती दूरशिक्षणचे संचालक डॉ. डी. के. मोरे यांनी दिली. डॉ. मोरे म्हणाले, जे विद्यार्थी



अजूनही शिक्षणापासून वंचित आहेत. ज्यांचे शिक्षण अपूर्ण आहे, शिवाय महाविद्यालयास तुकडी मान्यता न मिळाल्याने, तसेच महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाने नुकताच १२ वी रिपीटरच्या विद्यार्थ्यांचा निकाल जाहीर केलेला आहे. अशा उत्तीर्ण विद्यार्थ्यांना दूरशिक्षण आणि ऑनलाईन शिक्षण केंद्राच्या एकूण ८७ अभ्यासकेंद्रात प्रवेशाची संधी मिळणार आहे. त्यामुळे विद्यार्थी, गृहिणी, कामगार, सैनिक, उद्योजक, शेतकरी, सरकारी कर्मचारी, खासगी कंपन्या आदीनी आपला प्रवेश निश्चित करावा. शिवाजी विद्यापीठाच्या www.unishivaji.ac.in या संकेतस्थळावर व Distance Education लिंकवर प्रवेशाबाबतची माहिती उपलब्ध असून http://sukapps.unishivaji.ac.in/studentregistration/#/ या ऑनलाईन लिंकवर आपला प्रवेश निश्चित करावा.

तरुण भारत

# विद्यापीठात उद्या डॉ. ए. एन. उपाध्ये व्याख्यानमाला

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठ आणि बी. बी. पाटील दक्षिण भारत जैन सभा यांच्या संयुक्त विद्यमाने डॉ. ए. एन. उपाध्ये व्याख्यानमालेचे आयोजन केले आहे. ही व्याख्यानमाला गुरुवार ३ नोव्हेंबर रोजी सकाळी ११ वाजता दसरा चौकातील जैन बोर्डिंग येथे होणार आहे. प्रमुख पाहुणे सांगली येथील प्रमोद चौगुले 'जैन शिल्पकला व स्थापत्य' या विषयावर मार्गदर्शन करणार आहेत. सामाजिकशास्त्र शाखेचे अधिष्ठाता डॉ. एम. एस. देशमुख अध्यक्षस्थान भूषवणार आहेत. तरी जास्तीत जास्त लोकांनी या व्याख्यानासाठी उपस्थित राहावे, असे आवाहन प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे व महावीर अध्यासनाचे समन्वयक डॉ. विजय ककडे यांनी केले आहे.

तरुण भारत

# विद्यार्थी विकास विभाग संचालकपदी डॉ. प्रकाश गायकवाड

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या विद्यार्थी विकास विभागाच्या प्रभारी संचालकपदी डॉ. प्रकाश गायकवाड यांची नियुक्ती करण्यात आली आहे. ते गेल्या २८ वर्षापासून उच्चशैक्षणिक विशेषतः क्रीडा क्षेत्रात कार्यरत आहेत. विद्यापीठाच्या क्रीडा अधिविभागाचे प्रभारी संचालक म्हणून त्यांनी सहा वर्षांहून अधिक काळ काम पाहिले आहे. तसेच अधिविभागप्रमुख आणि ॲथलेटिक्स प्रशिक्षक म्हणूनही काम पाहिले आहे. तत्पूर्वी त्यांनी वाळवा येथील क्रांतीसिंह नाना पाटील महाविद्यालयातही शारीरिक शिक्षण संचालक म्हणून काम पाहिले. त्यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यापीठाच्या क्रीडापटूंनी अनेक राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्पर्धांमध्ये वैयक्तिक व सांघिक गटांत लक्षवेधी कामगिरी केली आहे. प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांच्या हस्ते डॉ. गायकवाड यांना नियुक्तीपत्र देण्यात आले. त्यांच्या ज्ञानाचा फायदा विद्यार्थी विकास विभागाला होईल, अशी अपेक्षा प्र-कुलगुरू डॉ. पाटील यांनी व्यक्त केली. कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के, प्रभारी कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांनीही त्यांचे अभिनंदन केले.



तरूण भारत

# विद्यापीठ परीक्षा अर्ज भरण्याच्या तारखा जाहीर

**प्रतिनिधी**
कोल्हापूर

- **ऑक्टोबर-नोव्हेंबर हिवाळी परीक्षा अर्ज भरण्यास १६ नोव्हेंबरपर्यंत मुदत**
- **विद्यापीठाच्या संकेतस्थळावर माहिती उपलब्ध**

शिवाजी विद्यापीठ अंतर्गत पदवी व पदव्युत्तरच्या ऑक्टोबर-नोव्हेंबर हिवाळी परीक्षा अर्ज भरण्याच्या तारखा जाहीर झाल्या आहेत. विनाविलंब शुल्कासह ३ ते १६ नोव्हेंबरपर्यंत विद्यार्थ्यांनी परीक्षा अर्ज भरावयाचा आहे. यासंदर्भातील सविस्तर माहिती विद्यापीठाच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. तरी विद्यार्थी, महाविद्यालयांनी याची नोंद घ्यावी, असे आवाहन परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव यांनी केले आहे.

विद्यार्थ्यांनी शिवाजी विद्यापीठ अंतर्गत ऑक्टोबर-नोव्हेंबर परीक्षेचा अर्ज ३ ते १६ नोव्हेंबरपर्यंत विनाविलंब शुल्कासह भरावयाचा आहे. विलंब शुल्कासह १८ ते २२ नोव्हेंबरपर्यंत तर अतिविलंब शुल्कासह २४ ते २८ नोव्हेंबर दरम्यान परीक्षा अर्ज भरावयाचा आहे. तसेच महाविद्यालय व अधिविभागांनी विनाविलंब शुल्कासह १९ नोव्हेंबर आणि विलंब शुल्कासह २४ नोव्हेंबर तर अतिविलंब शुल्कासह ३० नोव्हेंबरपर्यंत विद्यार्थ्यांच्या परीक्षा अर्जांची यादी विद्यापीठातील परीक्षा विभागास सादर करावी.

महविद्यालय अथवा परीक्षा विभागाने पदवी व पदव्युत्तर विभागाचे परीक्षा अर्जाला ऑनलाईन पध्दतीने विनाविलंब शुल्कासह १७ नोव्हेंबर, विलंब शुल्कासह २३ नोव्हेंबर तर अतिविलंब शुल्कासह २९ नोव्हेंबरपर्यंत मान्यता (अॅप्रूव्हल) द्यायची आहे. पदवी, पदव्युत्तर कला, वाणिज्य, विज्ञान, शिक्षणशास्त्र, सर्व डिप्लोमा, सर्टिफिकेट, बी. व्होक यासह अन्य अभ्यासक्रम तसेच अभियांत्रिकी, औषधनिर्माण, टेक्सटाईल्स, बी.टेक., विधी, एम.बी.ए. आदी अभ्यासक्रमाचे परीक्षा अर्ज भरण्यासाठीच्या तारखा विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द केल्या आहेत. तरी विद्यार्थी व महाविद्यालय, अधिविभागांनी या तारखांनुसार परीक्षा अर्ज भरावे, असे आवाहन परीक्षा संचालक डॉ. जाधव यांनी केले.